श्री बल्लाळेश्वर, पाली




# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १७७ वा ❑ शनिवार दि.३० ऑगस्ट २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## गणेशोत्सव: महाराष्ट्राच्या संस्कृतीचा उत्सव

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य



गणेशोत्सव हा केवळ एक सण नाही तर महाराष्ट्राच्या आत्म्याचा आणि संस्कृतीचा उत्सव आहे. महाराष्ट्र भारतातच नव्हे तर जगात गणेशोत्सव एक सांस्कृतिक उत्सव म्हणून साजरा केला जातो. भारताच्या स्वतंत्र आंदोलनात गणेशोत्सव एक राष्ट्रीय उत्सव म्हणून लोकमान्य टिळकांनी घोषित केले होते.लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी गणेशोत्सवाला एका सार्वजनिक व्यासपीठाचे स्वरूप दिले, ज्यामुळे तो स्वातंत्र्यलढ्याचे एक महत्त्वाचे साधन बनले. ब्रिटिश राजवटीत एकत्र येण्यावर बंदी असल्याने, या उत्सवाद्वारे लोकांना एकत्र येऊन स्वातंत्र्यासाठी एकत्र लढण्याची प्रेरणा मिळाली. टिळकांनी गणेशोत्सवाचा उपयोग राष्ट्रीय एकात्मता आणि सामाजिक जागृती वाढवण्यासाठी केला, ज्यामुळे हा सण एका राष्ट्रीय चळवळीत रूपांतरित झाला.

लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सवाला राष्ट्रीय रूप देऊन त्याला स्वातंत्र्यलढ्याशी जोडले याच धर्तीवर राज्य सरकारने आता गणेशोत्सव आता राज्य महोत्सव म्हणून घोषित केले आहे.

भारतात, भाद्रपद महिन्यातील चतुर्थी ते चतुर्दशी पर्यंत गणेशोत्सव साजरा केला जातो. हा हिंदू धर्मातील एक पौराणिक उत्सव आहे जो दहा दिवस चालतो. गणेशोत्सवाचे आयोजन युगानुयुगे केले जात आहे. सातवाहन, राष्ट्रकूट आणि चालुक्य राजवंशाच्या काळापासून या उत्सवाचे पुरावे आपल्याला आढळतात. मराठा शासक छत्रपती शिवाजी महाराजांनी गणेशोत्सवाला राष्ट्रीय धर्म आणि संस्कृतीशी जोडून एक नवीन सुरुवात दिली होती.

सनातन परंपरेतील श्री गणेशजी हे पहिले पूजनीय देवता आहेत. उत्तर भारत, दक्षिण भारत, पूर्व आणि पश्चिम भारतात गणेश उत्सवाच्या वेगवेगळ्या परंपरा आहेत परंतु सर्व परंपरांमध्ये गणेशजींचे स्थान खूप पूजनीय आणि आदरणीय आहे. या परंपरांपैकी, महाराष्ट्रातील पुणे आणि कोकण येथे सुरू झालेली दहा दिवसांची उत्सव परंपरा आज केवळ संपूर्ण भारतातच नव्हे तर जगातील अनेक देशांमध्ये मोठ्या उत्साहाने आणि उत्साहाने साजरी केली जाते.

गणेशोत्सवाची सांस्कृतिक ओळख व वारसा जपण्यासाठी राज्य सरकारने गणेशोत्सवाला राज्य उत्सव म्हणून घोषित केले. छत्रपती शिवाजी महाराज व लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या या या सांस्कृतिक परवाला जागतिक ओळख आहेच याव्यतिरिक्त संपूर्ण महाराष्ट्रभर ज्या उत्साहाने गणेशोत्सव साजरा केला जातो.तो दर्जा कायम रहावा यासाठी राज्य सरकारने या वर्षी पासून अधिक रंगतदार व्हावा म्हणून नोंदणीकृत मंडळांना अनुदान देण्याची घोषणा केली आहे. या निर्णयामुळे गणेश मंडळांना आर्थिक पाठबळ मिळणार असून या उत्सवातील विविध उपक्रम अधिक चांगल्या प्रकारे राबवता येतील. गणेशोत्सवाच्या माध्यमातून अधिकृत मंडळांनी गणेशोत्सवावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावे, या अनुषंगाने राज्यातील गणेशोत्सवानिमित्त अधिकारी व्यक्ती ,संस्था आणि विविध समाज घटकांना सामाजिक सलोख्यासाठी एकत्रित आणणे ,राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर साजऱ्या होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सवास प्रोत्साहन देणे, सांस्कृतिक विषयाचे जतन करणारे उपक्रम राबविणे, तसेच महाराष्ट्रात शिकणाऱ्या परदेशातील तसेच इतर राज्यांमधील विद्यार्थ्यांना या राज्य उत्सवात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे असे विविध उपक्रम गणेशोत्सवा दरम्यान साजरे करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे गणेशोत्सव केवळ एक धार्मिक सन न राहता एक भव्य सांस्कृतिक महोत्सव म्हणून उदयास येईल यामुळे महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेला आणखीन बळकटी मिळेल. त्यामुळे यावर्षीच्या गणेशोत्सव खास राहणार आहे.या पार्श्वभूमीवर


गणेशोत्सव निमित्ताने राज्याच्या कानाकोपऱ्यात हजारो गणेश मंडळे सजली आहेत त्यापैकी काही त्यांच्या भव्यतेमुळे, परंपरा आणि आध्यात्मिक आभामुळे खास बनले आहेत.

# महाराष्ट्रातील चार शिक्षकांचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने सन्मान

ज्योतिर्मय साहित्य

**नवी दिल्ली** – भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२५ जाहीर केले असून, महाराष्ट्रातील चार शिक्षकांनी आपल्या उत्कृष्ट योगदानामुळे हा प्रतिष्ठित सन्मान प्राप्त केला आहे. शालेय आणि उच्च शिक्षण क्षेत्रातील या शिक्षकांनी नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती, संशोधन आणि सामाजिक योगदानाद्वारे विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा दिली आहे. हा पुरस्कार ५ सप्टेंबर २०२५ रोजी शिक्षक दिनानिमित्त राष्ट्रीय स्तरावरील समारंभात प्रदान करण्यात येणार आहे.

शिक्षण मंत्रालयाच्या शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाने देशभरातील २७ राज्ये, ७ केंद्रशासित प्रदेश आणि ६ संस्थांमधून ४५ शिक्षकांची निवड राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२५ साठी केली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील नांदेड



येथील जिल्हा परिषद हायस्कूल, अर्धपूर येथील डॉ. शेख मोहम्मद वकुओद्दीन शेख हमीदोद्दीन आणि लातूर येथील दयानंद कॉलेज ऑफ आर्टमधील डॉ. संदीपन गुरुनाथ जगदाळे यांचा समावेश आहे. या दोन्ही शिक्षकांनी नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या समर्पित कार्यामुळे हा पुरस्कार मिळवला आहे. निवड प्रक्रिया पारदर्शी आणि कठोर स्वरूपाची असून, ती जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय अशा तीन स्तरांवर २३ जून ते २० जुलै २०२५ या कालावधीत ऑनलाइन पद्धतीने पार पडली. एकूण ४५ पुरस्कार विजेत्यांपैकी २४ पुरुष आणि २१ महिला शिक्षकांचा समावेश आहे.

उच्च शिक्षण विभागाने राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२५ साठी देशभरातील २१ शिक्षकांची निवड केली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील मुंबईतील शाह अँन्ड अँकर कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालयातील डॉ. नीलाक्षी जैन आणि बारामती येथील एस व्ही पी एम इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड इंजिनिअरिंग महाविद्यालयातील प्रा. पुरुषोत्तम पवार यांचा समावेश आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार, उच्च शिक्षणातील प्रेरक आणि सक्षम प्राध्यापकांना प्रोत्साहन देण्यासाठी २०२३ मध्ये या पुरस्काराची सुरुवात झाली. निवड प्रक्रियेत अध्यापन परिणामकारकता, समाजाभिमुख उपक्रम, संशोधन, नवोन्मेष आणि प्रायोजित संशोधन यासारख्या निकषांवर मूल्यमापन करण्यात आले. डॉ. जैन आणि प्रा. पवार यांनी आपल्या उत्कृष्ट अध्यापन आणि सामाजिक योगदानामुळे हा पुरस्कार प्राप्त केला आहे.

# समाजातील सर्व घटकांना सामावून घेणारा उन्न '' ती '' चा गणेश उत्सव

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे ( विजय न्यायाधीश )** – समाजातील सर्व घटकांना सामावून घेणारा पिंपरी चिंचवड परिसरातील एकमेव महिला मंडळाचा गणेश उत्सव म्हणून उन्नती सोशल फाउंडेशनच्या गणेशोत्सवाचा उल्लेख केला जातो. गेल्या सात वर्षांपासून विविध उपक्रमाव्दारे वैशिष्ट्यपूर्ण ठरलेल्या या उत्सवाने यंदाही आपली परंपरा कायम ठेवली आहे. ''मुर्ती आमची किंमत तुमची'' या उपक्रमा अंतर्गत दरवर्षी परिसरातील नागरिकांना आणि गावठाणातील सार्वजनिक गणेश मंडळांना शाडू मातीपासून तयार करण्यात आलेल्या गणेशमुर्ती दिल्या जातात. त्यासोबतच विविध वनस्पतींची रोपे असलेल्या कुंड्यांचेही यावेळी वाटप करण्यात येते. त्याआधी लहान मुलांसाठी ''पर्यावरण पूरक श्री गणेशा कार्यशाळा'' या अंतर्गत शाडू मातीपासून गणपतीची मुर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण दिले जाते. या परंपरेनुसार यंदा एक हजार श्रींच्या मुर्तींचे वाटप करण्यात आले.

दहा दिवस चालणाऱ्या उन्नतीच्या या उत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे उद्योगपतींपासून ते स्वच्छता कर्मचाऱ्यांपर्यत समाजातील विविध घटकांना या उत्सवात सहभागी करुन घेतले जाते. त्यामध्ये ज्येष्ठ नागरिक, पोलिस, लष्करातील जवान, राजकीय क्षेत्रातील व्यक्ती, कलावंत, खेळाडू, दिव्यांग, तृतीयपंथी, परितक्त्या आदींच्या हस्ते सकाळी अणि संध्याकाळी होणाऱ्या गणेश आरतीचा मान दिला जाऊन खऱ्या अर्थाने सामाजिक समरसतेचा संदेश दिला जातो. याव्यतिरिक्त भारतीय वाद्य संस्कृती जपणाऱ्या ढोल- ताशा आणि लेझिम पथकातील वादक आणि नृत्य कलावंतांना रोख स्वरूपात बक्षिस आणि सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात येते. उन्नती





सोशल फाउंडेशनचे संस्थापक संचालक डॉ. कुंदाताई भिसे आणि संजय भिसे यांच्या संकल्पनेतून दरवर्षी साजरा केल्या जाणाऱ्या या उत्सवाची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत चालली असून हा महोत्सव लोकाभिमुख होत चालला आहे.

## राज्यातील यशस्वी खेळाडूंना दिलेले २२ कोटींचे रोख बक्षिस्स खेळाडूंच्या कष्टाला दिलेली दाद-उपमुख्यमंत्री अजित पवार

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे** – ''राज्यातील यशस्वी खेळाडूंना दिलेली २२ कोटींची रोख बक्षिसे ही त्यांच्या कष्टाला दिलेली खरी दाद आहे,'' असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केले. राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून म्हाळुंगे बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुल गजबजून गेले होते. महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित या सोहळ्यात आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील ३३१ विजेत्यांचा सन्मान करण्यात आला. या खेळाडूंना एकूण २२ कोटी ३१ लाख रुपयांची पारितोषिके देण्यात आली.

उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते १३ आंतरराष्ट्रीय व ३१८ राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंना पारितोषिके देण्यात आली. सुवर्णपदक विजेत्यांना प्रत्येकी ७ लाख, रौप्यपदक विजेत्यांना ५ लाख आणि कांस्यपदक विजेत्यांना ३ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले. कार्यक्रमात ''मिशन लक्ष्यवेध हाय परफॉर्मन्स सेंटर'' या महत्वाकांक्षी योजनेच्या लोगोचे अनावरणही उपमुख्यमंत्री पवार आणि क्रीडा मंत्री ॲड. कोकाटे यांच्या हस्ते झाले.

या प्रसंगी ऑलिम्पिक पदक विजेता स्वप्नील कुसाळे, आमदार बाबाजी काळे, क्रीडा आयुक्त शीतल तेली-उगले, सहसंचालक सुधीर मोरे, माजी क्रीडा प्रशासक नामदेव शिरगांवकर, प्रशिक्षक संजय शेटे आदी मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सलग दुसऱ्यांदा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदकांचे द्विशतक झळकावले आहे, जे राज्याच्या क्रीडा परंपरेला अभिमानास्पद आहे. ''खेळाडूंच्या मेहनतीतून राज्याला मिळालेले यश हे १३ कोटी महाराष्ट्राच्या जनतेचे सामूहिक अभिमानाचे कारण आहे. खेलो इंडियासह इतर आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांनी केलेल्या ५८ कोटींच्या निधीच्या मागणीस तात्काळ मंजुरी दिली आहे. खेळाडूंना आवश्यक त्या सुविधा देऊन महाराष्ट्राने ऑलिम्पिकसह जागतिक स्तरावर वर्चस्व निर्माण करावे, हे आमचे ध्येय आहे,'' असे त्यांनी नमूद केले.


त्यांनी पुढे सांगितले की, बालेवाडीतील शिवछत्रपती क्रीडा संकुलात देशातील पहिले ऑलिम्पिक संग्रहालय उभारण्याचा निर्णय घेतला आहे. हे संग्रहालय केवळ खेळाडूंच्या कामगिरीचा ऐतिहासिक दस्तऐवज नसून, नवीन पिढीला प्रेरणा देणारे व खेळात शिस्त, मूल्ये व संस्कार रुजवणारे केंद्र ठरणार आहे.

क्रीडा मंत्री ॲड. कोकाटे म्हणाले की, ''आरोग्यदायी, क्रीडामय महाराष्ट्र हे आमचे ध्येय आहे. राज्याचे नवीन क्रीडा धोरण लवकरच जाहीर करण्यात येईल. हे धोरण खेळाडूंना न्याय देणारे व त्यांच्या प्रगतीस चालना देणारे असेल. त्यातून महाराष्ट्राचे खेळाडू आंतरराष्ट्रीय व ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये अधिकाधिक पदके जिंकतील.''

फेब्रुवारीत उत्तराखंड येथे पार पडलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने ५५ सुवर्ण, ७० रौप्य व ७६ कांस्य अशी एकूण २०१ पदके पटकावून प्रथम क्रमांक मिळविला होता. या यशाचे स्मरण करत राज्य सरकारने ३१८ राष्ट्रीय विजेते व १३ आंतरराष्ट्रीय विजेते खेळाडूंचा गौरव केला. राज्याच्या क्रीडा धोरण २०१२ नुसार खेळाडू व मार्गदर्शकांना एकूण २८ कोटी ७० लाख रुपयांची पारितोषिके वितरित करण्यात आली.

दरम्यान, वार्षिक १६० कोटी रुपये खर्च असलेल्या ''मिशन लक्ष्यवेध'' या महत्वाकांक्षी योजनेचाही शुभारंभ आज झाला. पहिल्या टप्प्यात ॲथलेटिक्स, हॉकी, कुस्ती, वेटलिफ्टिंग, रोईंग व लॉन टेनिस या सहा क्रीडा प्रकारांना प्राधान्य देण्यात आले असून उच्च दर्जाचे प्रशिक्षण, आधुनिक उपकरणे व तज्ज्ञ प्रशिक्षकांची मदत खेळाडूंना देण्यात येईल. या योजनेमुळे महाराष्ट्राचे खेळाडू आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधांमध्ये सराव करून जागतिक स्तरावर पदके जिंकण्याची संधी मिळेल.

क्रीडा आयुक्त शीतल तेली-उगले यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी राज्यातील क्रीडा विकासाची पार्श्वभूमी, केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा उल्लेख केला. आभारप्रदर्शन सहसंचालक सुधीर मोरे यांनी केले.




# जात्यावरच्या ओव्या......

वडील भाऊ राया
करणी तु ही दाव
कापडी मांडव
बिल्लोरी हंड्या लाव ॥२३१॥

सासूचा सासुरवास
नंदाचा उभा काच
बोलले महे दादा
ऐकून राह्य भरताराच ॥२३२॥

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# श्री गणेशाला दुर्वा प्रिय का...?





ज्योतिर्मय साहित्य

नुकताच श्रावण महिना संपला आहे. पाऊस जरा कमीजास्त झाला असला तरी डोळ्यांना सुखावणारी हिरवळ सर्वत्र आहे. ऊन सावलीचा आणि पावसाचा खेळ सुरु आहे. तशातच मंगलमुर्ती श्री गणेशाचे आगमन झाले आहे. श्रावण आणि भाद्रपदात निसर्गाचा चमत्कार पाहायला मिळतो. एरवी वर्षभर सहज उपलब्ध नसणारी विविध प्रकारची फुले, पाने, पत्री आपल्याला मुबलकपणे उपलब्ध होतात. निसर्ग मुक्तहस्ताने आपल्या सौंदर्याची उधळण करीत असतो. अशा वातावरणात आपल्याही चित्तवृत्ती आनंदाने फुलून आलेल्या असतात. अशाच प्रसन्न काळात आपले गणपती, गौरी असे सण येतात.



हरतालिकेची पूजा करताना स्त्रिया विविध प्रकारची पत्री पूजेसाठी वापरतात. आणि गणेश चतुर्थीला आपण श्री गणेशाला एकवीस प्रकारची पत्री वाहतो. या प्रत्येक पानाफुलांमध्ये औषधी गुणधर्म दडलेले आहेत. आधुनिक जीवनशैलीत आपण निसर्गापासून थोडे दूर गेलो आहोत. त्यामुळे आपल्याला त्याविषयी फारशी माहिती नसते. पण या सणांच्या निमित्ताने ती होते. आपल्या पूर्वजांनी किती कल्पकतेने निसर्गाचा आणि या सणांचा सुरेख मेळ घातला आहे. या सणांसाठी आवश्यक असणारी पाने, फुले आदी गोळा करण्याच्या निमित्ताने आपण निसर्गात जातो. स्त्रियाही घराबाहेर पडून निसर्गात यानिमित्ताने का होईना पण आपले पाय आणि मन मोकळे करतात. आवश्यक ती पत्री गोळा करून त्यांची माहिती करून घेतात. शहरातून हल्ली एवढे शक्य नसले तरी बाजारातून का होईना आपण ही पत्री, फुले, पाने, दुर्वा इ. गोष्टी विकत आणतोच. पण या सर्व साहित्यात या सर्वांमध्ये दुर्वांचे महत्व काही वेगळेच आहे.

गणपतीला दुर्वा का प्रिय आहेत या संबंधी दोनतीन कथा आहेत. त्या आपण या निमित्ताने पाहू या. दुर्वा हे ब्रह्मदेवाच्या कन्येचे नाव. ती अत्यंत सुंदर होती. तिने तपश्चर्या करून गणपतीला प्रसन्न करून घेतले. पण पुढे तिला आपल्या सौंदर्याचा आणि ऐश्वर्याचा गर्व झाला. इतका की ती देवी लक्ष्मीला सुद्धा तुच्छ समजू लागली. तेव्हा तिचा गर्व हरण करण्याच्या उद्देशाने देवीने तिला शाप दिला की पृथ्वीवर तृणरूपाने राहशील. या मुळे दुर्वेला खूपच वाईट वाटले. तिने पुन्हा उग्र तप केले. आणि श्री गणेशाला प्रसन्न करून घेतले. म्हणून गणेशाला दुर्वा प्रिय आहेत. **(क्रमशः)**



## दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# बद्धलक्षण

ज्योतिर्मय साहित्य

आरंभबिंदूकडून अंत्यबिंदूकडे जाताना मध्यबिंदू लागतो. त्यामुळे माणसाचे आणखी दोन वर्ग.होतात. आरंभबिंदू सोडून मध्यबिंदू कडे सरकणारे हा तिसरा वर्ग आणि मध्यबिंदू कडून अंतबिंदूकडे सरकणारे हा चौथा वर्ग होय. तिसऱ्या वर्गातील माणसाला''मुमुक्षु म्हणजे मोक्षाची इच्छा असणारा'' असे नाव दिले आहे. तर चौथ्या प्रकारचे लोक ''साधक'' या वर्गात येतात. जे साधना करतात तपश्चर्या करतात ते साधक लोक होय. आता यातील ऊत्तमोत्तम लक्षणे कोणती ते पाहू या.

साधक म्हणजे साधना करणारा.

परमार्थाच्या प्रगतिपथावर बद्धापेक्षां मुमुक्षु ऊत्तम.

मुमुक्षापेक्षां साधक अधिक उत्तम.

साधकाहून सिद्ध सर्वोत्तम होय.

जसे हाताची पाचही बोटे एकसारखी नाहीत तसेच जगातील सर्व माणसे एकसारख्या विचारांची नाहीत.

काळा, गोरा, खुजा, ऊंच हे माणसाच्या बाबतीत जसे असते. त्याप्रमाणे समर्थानी जगातील माणसाचे चार विकार सांगितले आहेत. सर्वत्र माणसांचीच गर्दी आहे .

या लोकांच्या चार विभागात विभागणी केली आहे.

बद्ध, मुमुक्षु, साधक, सिद्ध असे ते चार प्रकार आहेत.


हा सर्व समास बद्ध लक्षणांचा आहे.

बद्धलक्षणाच्या माणसाला आत्मज्ञान नसते. खरं तर सर्वसामान्य प्रापंचिकाचे वर्णन या समासात दिसते.

मित्रांनो अगदी आपल्याला अवतीभवती दिसणारे सर्व सामान्य लोक या प्रकारात असतात आणि हे समास वाचताना लक्षात येते.

**(क्रमशः)**

# नाम व विकल्प !



## श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

नाम घेऊ लागले की विकल्प उठतात आणि ते घेण्याबद्दलची निष्ठा कमी होते, याला काय करावे ? अशी तक्रार आपण सर्वसाधारणपणे करतो; पण असे होण्यातच नामाचे महत्त्व प्रस्थापित होते हे आपल्या लक्षात येत नाही. मनुष्य नाम घेऊ लागला की विकल्पांना असह्य होते, आणि आता हा नाम घेऊ लागला, आता आपली धडगत नाही, अशा धास्तीने त्यांची चळवळ चालू होते, आणि मनुष्याला नामापासून परावृत्त करण्याचा ते प्रयत्न करतात. विकल्प हे अती सूक्ष्म आहेत. त्यांचे उच्चाटन करायला त्यांच्यापर्यंत पोहोचणारा आणि तितकाच सूक्ष्म असा उपाय पाहिजे. तो उपाय म्हणजे भगवंताचे नाम. एखाद्या बिळात सर्प शिरला तर त्याला बाहेर काढण्याकरिता त्याच्यापर्यंत पोहोचून त्याला तिथे राहणे असह्य करील असाच उपाय करणे जरूर असते. बाहेरून कितीही आरडाओरडा केला तरी त्याचा उपयोग होत नाही. बिळात धूर किंवा गरम पाणी सोडले की तो बाहेर येतो. त्याप्रमाणे, नाम घेतले की विकल्प उठतात, म्हणजे विकल्पांच्या मूळ ठिकाणापर्यंत नामाची आच जाऊन पोचली असे ठरते. तर मग नाम घेऊ लागल्यावर विकल्प येऊ लागले तर गांगरून न जाता, हे सुचिन्ह आहे असे समजून, विकल्पांच्या उच्चाटनाची गुरुकिल्ली मिळाली अशा जाणिवेने, जास्त आस्थेने नाम घेण्याचा निश्चय करावा, हाच त्याला उपाय. नामाबद्दल सुरुवातीला सर्वांचीच वृत्ती साशंक असते, पण आपण सतत नाम घेत गेल्यानेच विकल्प कमी होतात. कोणतीही गोष्ट अभ्यासानेच साध्य होत असते. आज खरी भक्ती नाही म्हणून भगवंताचे स्मरण नाही; आणि भगवंताचे स्मरण ठेवण्याचा अभ्यास केल्याशिवाय खरी भक्ती येत नाही. शहाण्या माणसाने उगीच विकल्प न लढविता भगवंताचे स्मरण ठेवायला आरंभ करावा. विकल्प जाऊन भगवंताचे संकल्प उठू लागले की आपले काम झाले. आपण रस्त्याने चाललो की नको ती माणसे भेटायचीच; पण आपण आपले चालणे चालू ठेवावे. तसे, विकल्प आले तरी आपण आपले नाम सोडू नये. पण गंमत अशी होते की, वाईट मनुष्य भेटला आणि आपण त्याच्याकडे लक्ष द्यायचे नाही असे म्हटले तरी, तो मुद्दाम खाकरतो आणि आपले लक्ष वेधतो. अशा वेळी त्याच्याकडे पाहूनही आपण दुर्लक्ष करतो. त्याचप्रमाणे विकल्पांनी आपले लक्ष ओढून घेतले तर नावडीने लक्ष द्यावे पण आपले नाम सोडू नये. शंका घ्यायचीच झाली तर नाम चालू ठेवून घ्या, म्हणजे ते नामच शंकांचे निरसन करील आणि विकल्पांनाही हळूहळू पायबंद घालील.

९. पुष्कळ केलेले शंकेने व्यर्थ जाते. आपण नाम सोडणार नाही हे नक्की ठरविले की आपली वृत्ती निःशंक होतेच होते.

# ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

## संत ज्ञानेश्वर महाराज यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

मनाचा मृत्यू म्हणजे समाधी ही व्याख्या आपण पूर्वी ऐकलेली आहे ज्यावेळेस प्राण उर्ध्वगामी होतो मन जवळपास संपल्यात जमा असते मी तू पणाची जाणीव उरतच नाही बुद्धीही कुंठीत होते आणि अहंकार लीन असतो त्यावेळेसच अविद्येचे मळभ संपल्या जाते. सूक्ष्म स्तरावरील विकारांचे जमाव नष्ट केले जातात. योगाग्नीने शरीरात अग्नि तांडव सुरू केलेले असते. यामध्ये पापांची किल्मिशे जळून भस्म होतात. मन निष्पन्द असते. जाणीव तर असते पण ती कोणाला येते याविषयी शब्दात मांडणे अवघड जाते. अशा वेळेस आत्मा पुन्हा तेजपुंज स्वरूपात बुद्धीवर प्रकाश टाकतो म्हणून हृदयस्त परमात्मा म्हणजेच आत्मा हा तेजोमय रीतीने लकाकला आहे, त्या तेजाचे वर्णन ज्ञानेश्वर माऊली येथे असे करीत आहेत.

साकार निराकार शून्या शून्य दिठा
रुपी रूप वाटा हरी माझा

साधनेच्या निम्नस्तरावर भगवंताचे सगूण रुप दर्शन होत असते. या सगुणाच्या दर्शनानंतर त्याची साधना निर्गुण निराकार परमात्म्याच्या अनुभव घेण्यासाठी पुढे सरकते. यानंतर ज्ञानप्राप्ती म्हणजेच आत्म्याचा अनुभव येतो. हा निर्गुण निराकार परमात्म्याचा अनुभव आहे. आत्मा व परमात्मा हे एकच आहेत हे आता जाणवते.

ही साधना ज्ञानानंतर पुढे सविकल्प समाधी चा अभ्यास दृढ करून नंतर निर्वी कल्प समाधीकडे झेप घेते. या निर्वी कल्प समाधीत एक उच्चतम अनुभव आहे. तो म्हणजे महा शून्याचा. हा महा शून्याचा अनुभव, करोडो करोडो लोकांमधून एखाद्याच भाग्यवंतास अनुभवता येतो.

आपल्या भोवती काहीही नाही. केवळ निर्वात पोकळी आहे. खूप अंधकार दाटलेला आहे. या पोकळीचा आदी अंत कुठेच लागत नाही.हे केवळ जाणवते. पण देह भावांना पूर्णपणे संपलेली असते. मन हे जवळपास मेल्यात जमा असते. विचार नसतातच फक्त या निर्वात पोकळीचा अनुभव घेणारा कोणीतरी आहे. त्यास अनुभव येत आहेत असे भासते. ही समाधीची प्रगाढ अवस्था आहे. यात साधक बऱ्याच वेळेस बाहेर कसे पडावे हे त्याला कळत नाही. या समाधीत अखंड अमर्याद महानंद मिळत असतो.

सर्वत्र अंधकार दाटला आहे. निर्वात पोकळी आहे, आणि काहीही नाही हा निर्गुण निराकार परमात्म्याचा प्रत्यक्ष अनुभव असतो.अनाहत नादाच्या साथीने सद्गुरु शिष्यास यातून बाह्य जगतात परत आणतात व लोक कल्याणाची कामे करण्यासाठी त्यास उपदेश करतात.

तुज सगुण म्हणू की निर्गुण रे
सगुण निर्गुण एक गोविंद रे

हा सगुणा पासून निर्गुणा पर्यंत आणि निर्गुणात येताच महा शून्याचा महानुभव माऊलींनी घेतला व त्यांचा आत्मा हाच परमात्मा आहे यांचे विषयी त्यांचा निश्चय झाला. ही अवस्था त्यांच्या असा साधनेने परिपुष्ट झाली व त्यांच्या उपादेय हृदयात रखुमाईचा पती तो परमात्मा स्थिर झाला. हा परमात्मा अनेकांना केवळ मुर्तीतच

आहे असे वाटते ही उफराटी कळा म्हणजे चुकीची बाजू आहे असे माऊली म्हणतात.

असे अनुभव जेंव्हा मनात शब्दच नाहीत अशा अवस्थेत मांडले आहेत. हे कोणत्या शब्दात मांडता येतील हे किती कठीण काम आहे ?तरीही माऊलींचे सामर्थ्य इतके की त्यांनी चपखल शब्दात हे दिव्य अनुभव मांडलेले आहेत.

या ज्ञानियांच्या राजास गुरु, महाराजांस विनम्रपणे अभिवादन करून हा लेख इथे संपवितो.

# ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

५०. सदा सोबती तू कृपाकारिणी तू
न लागे तुला सांगणे रेणुकांबेहिता जाणते तू सुताच्या सदा हो ।तुझे
लक्ष माझ्याकडे नित्य राहोमला ।मराला तुझी ओढ लागो ।।
भ्रमे विभ्रमे चित्त माझे तरीहीक्षमा तू करीशी समीपे बसोनी।मला
सांगते तू हिताच्या प्रयुक्तीकधी दिव्य गोष्टी शिवे तू हसोनी।।
जगी तू वरिष्ठा तथा वत्सला तूतुझे प्रेम माये असे सर्व माझे ।सदा
सोबती तू कृपाकारिणी तूतुझे प्रेम माये असे सर्व माझे ।।
५१. मना, रूप ते अम्बिकेचे स्मरावे
मना, रूप ते अम्बिकेचे स्मरावे
तुझे मागणे जे, तिला तू वदावे ।मनुष्यां न काही, तुवा रे वदावेखरे
एक बाळा, तिने जे दिले ते ।।
तुला नित्य सांभाळिलेसे तिने रेतुला नित्य संरक्षिलेसे तिने रे ।असे
नित्य पाठी, तुझी कामधेनुतरी का करीशी, मनी काळजी रे ।।
न मागे कुणाला कधी लेकरा तूतिचे पादपद्मी, मना बैसवी तू ।दिले
जे तिने ते कधी ना सरे रेतिला सांग जे जे हवे ते तुला रे ।।



# आरोग्य संजीवनी

## गरोदरपणात तूप स्त्रीच्या आरोग्यासाठी फायदेशीर

ज्योतिर्मय साहित्य

आई होण्याचे स्वप्न पाहण्यापासून ते आई होण्यापर्यंतचा प्रवास स्त्रीसाठी खूप रोमांचक, भावनिक आणि जबाबदार असतो. आईच्या आरोग्यासाठी आणि बाळाच्या विकासासाठी गर्भधारणेपासून नवव्या महिन्यापर्यंत गर्भवती महिलेच्या आहाराची अत्यंत काळजी घेतली जाते. या काळात चांगले अन्न, औषधोपचार, व्यायाम, चांगली पुस्तके, आजूबाजूचे चांगले वातावरण हे खूप महत्त्वाचे आहे. गरोदरपणात भरपूर फळे, भाज्या, पातळ प्रथिने आणि हेल्दी खाण्याचा सल्ला दिला जातो. कारण गर्भधारणेदरम्यान स्त्री जे काही खाते त्याचा तिच्या आणि मुलाच्या आरोग्यावर खूप परिणाम होतो. जेव्हा मूल पोटात वाढत असते तेव्हा त्याची आई त्याच्या अन्नाचा स्रोत असते. आई जे काही खाते ते थेट मुलाला जाते. म्हणूनच अनेक स्त्रिया गरोदरपणात भरपूर तूप खातात.

गरोदरपणात तूप स्त्रीच्या आरोग्यासाठी फायदेशीर

प्रसूती-स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ राम्या काबिलन यांच्या मते, भारतीय स्वयंपाकात वापरल्या जाणाऱ्या मुख्य घटकांपैकी तूप एक आहे. जेव्हा एखादी स्त्री गरोदर असते तेव्हा तिला घरातील वडीलधारी मंडळी तूप खाण्याचा सल्ला देतात. गरोदरपणात

तूप खाणे स्त्रीच्या एकूण आरोग्यासाठी खूप फायदेशीर असते. हे पचनासही खूप मदत करते.

गरोदर स्त्रीने तूप खाल्ल्यास बाळ सहज बाहेर येते का...?

गर्भवती महिलेने तूप का खावे यावर प्रसूती-स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. रम्या कबिलन यांनी त्यांच्या 'इन्स्टाग्राम' पोस्टमध्ये स्पष्ट केले आहे. तुम्ही गरोदर असताना रोज एक चमचा तूप खा. तूप आईच्या आणि बाळाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असते. पण अनेकदा असे सांगितले जाते की, गरोदरपणाच्या शेवटच्या महिन्यांत तूप खाल्ल्याने योनीमार्गातून बाळाला सहज बाहेर येण्यास मदत होते. मात्र हे खरे नाही, असे डॉक्टर सांगतात.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९


तूप बाळाच्या मेंदू आणि मज्जासंस्थेसाठी फायदेशीर...

पारंपरिक आयुर्वेदिक औषधांमध्ये शतकानुशतके तुपाचा वापर केला जात आहे आणि गरोदर महिलांसाठी याचे विविध आरोग्यविषयक फायदे आहेत. तुपामध्ये आवश्यक जीवनसत्त्वे असतात, जी गर्भधारणेसह बाळाच्या आणि आईच्या आरोग्यासाठी खूप चांगली असतात. गर्भवती महिलांना संपूर्ण गर्भधारणेदरम्यान उत्साही राहण्यास ते मदत करते. मुलाच्या मेंदू आणि मज्जासंस्थेच्या योग्य विकासासही मदत करते.

निरोगी त्वचा...

त्वचेची काळजी घेण्यासाठी आयुर्वेदिक पद्धतींमध्ये तुपाचा वापर अनेकदा केला जातो. गरोदर महिलांना गरोदरपणात त्यांच्या त्वचेत बदल जाणवू शकतात आणि तूप मॉइश्चरायझर म्हणून वापरल्यास किंवा त्वचेची काळजी घेण्यासाठी घरगुती उपाय केल्यास त्वचेचे पोषण आणि कोरडेपणा किंवा खाज कमी होण्यास मदत होते.

# ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

कोणाचा दृष्टांत...

विभीषणहाने तुमच्या शिवाय मी कोणास शरण जावे?

भगवान म्हणतात ना मला शरण आला त्याचे रक्षण मी करतो.कारण जगात शरन्य केवळ मी आहे.स्वतःला वेगळे न समजता मला एकरूप होणे हे शरण होय.

बिभीषण आला.चरणावर मस्तक ठेवले सर्व लोकात तुम्हीच एकमेव शरन्य असेल. मी सर्व सोडून आला.मी लंकेचा परित्याग केला.मी मित्रा सोडले धन सोडले.असा निःसंग होऊन आलो.सर्वांना हे आवडले. रामानी त्यास तुला रावण वधानंतर लंकेच्या गादीवर बसविण्याचे वचन दिले.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

लक्ष्मण म्हणे तुम्ही असे वचन लगेच द्यायला नको म्हणे. कारण समाज रावण शरण आला तर तुम्ही त्यास मारू शकणार नाही मग याला गादीवर कसे बसविणार?

राम म्हणाले असे झालेच तर मी अयोध्येचे राज्य बिभीषणास देईल.

पुन्हा एकदा सामोपचाराचा प्रयत्न केला पण उपयोग झाला नाही.

समुद्रांनी ३ दिवस वाट पाहूनही दिली नाही शेवटी धनुष्य वर बाण चढविला की घाबरून सह कुटुंब प्रकट झाला. तुम्ही सत्र काढल्या शिवाय प्रकट झाला नाहीत. समुद्र म्हणे मी तुमचा पूर्वज आहे तुम्ही माझे वंशज आहात पण खरे सांगतो तुमची मला लाज वाटते, तुमचे तोंड पाहण्याची लाज वाटते.

**(क्रमशः)**

# वडापाव



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

महाराष्ट्रातील प्रसिद्ध वडापाव अनेकांचे पोट भरतो. काहींचा तर सकाळचा नाश्ता ते रात्रीचे जेवण हा वडापावच असतो. असंही म्हटलं जातं की वडापाव कधी कोणाला उपाशी झोपू देत नाही. ज्याची आर्थिक स्थिती कमकुवत आहे तो वडापाव तरी निश्चित खाऊ शकतो. आजच्या दिवशी जागतिक वडापाव दिवस साजरा केला जात आहे. रस्त्यावरच्या गाडी पासून ते रेस्टॉरंटमध्ये वडापाव सर्वत्र मिळतो. वडापावाची किंमत १० रुपयांपासून ते ८० ते १००० रुपयांपर्यंत आहे. जेव्हा वडापाव सुरु झाला तेव्हा त्याची किंमत अगदी १० रुपयांपेक्षाही कमी होती. ही आजची किंमत झाली. मी प्रथम वडापाव खाल्ला तो चारआणे म्हणजे २५ पैशाला मिळाला होता. आणि तो कसा खातात हे पण माहिती नव्हते. मग माझ्या काकांनी सांगितले, असा पाव घ्यायचा. त्याचे दोन भाग करायचे, मात्र एका बाजूने जोडलेला ठेवायचा आणि त्याच्या पोटात पाव ठेवायचा. असे सांगून थांबले नाहीत तर कृती करुन दाखवली.

सध्या दिवसा किंवा रात्री कधीही वडापाव खायला मिळतो. वडापाव सुरू झाला तेव्हा ६ ते ७ तास उपलब्ध असायचा. दुपारी २ ते संध्याकाळी ६ या वेळेत गाडीवर विक्री केली जात असे. पूर्वी फक्त मुंबईत काही ठिकाणी उपलब्ध होता. आज मुंबई असो किंवा भारतातील इतर कोणतेही शहर, वडा पाव कुठेही मिळेल. एवढेच नाही तर परदेशातही वडा पाव मिळतो. वडापाव हे काही लोकांच्या उपजीविकेचे अन्न आहे. वडापावचा जन्म १९६६ मध्ये दादर स्टेशनच्या बाहेर अशोक वैद्य यांच्या फूड ट्रकमध्ये झाला होता. सुधाकर म्हात्रे यांचा वडापावही दादरमध्ये सुरू झाल्याचे लोक सांगतात. पूर्वी बटाट्याची भाजी आणि पोळी खाण्याऐवजी बेसनाच्या पिठात बटाट्याची भाजी तळून वडा बनवायला सुरुवात केली. जेव्हा १९७० ते १९८० च्या दशकात मुंबईत कंपन्या बंद पडू लागल्या. मग तो मजुरांच्या उदरनिर्वाहाचा पदार्थ बनला. ठिकठिकाणी गल्लीबोळात हळूहळू वडापावच्या गाड्या आणि लोकांनी बाळासाहेब ठाकरे यांना पाठिंबा दिला. मराठी माणसाने व्यवसायात उतरावे असे त्यांचे मत होते. त्यामुळे वडापावचा छोटासा व्यवसाय सुरू झाला. त्याचवेळी शिवसेनेने दक्षिण भारतीयांच्या विरोधात भूमिका घेतल्याने शिवसेनेने मुंबईतील दादर, माटुंगा यांसारख्या भागातील उडपी हॉटेल्समध्ये दाक्षिणात्य खाद्यपदार्थांचा निषेध करण्यासाठी वडापावचा प्रचार सुरू केला. उडपी ऐवजी वडापाव खायला सुरुवात केली. शिवसेनेने वडापावला राजकीय पातळीवर ब्रँड केले. अशा प्रकारे शिव वडापावचा जन्म झाला. आज अनेक ठिकाणी अनेक प्रकारचे वडापाव मिळतात. त्यांची नावे व त्यातील पदार्थ बघून त्याला वडापाव म्हणावे का? असा प्रश्न निर्माण होतो.




मसाला, चीज, नूडल्स, उलटा, ग्रील, कर्जत, क्लासिक, कट, शेजवान, जैन, मॅगी अजूनही विविध प्रकार आहेत. शेगावला तर एक वेगळाच प्रकार मिळाला. त्याला वडापाव म्हणावे की पाव वडापाव म्हणावे तेच कळेना. पण असे कितीही विविध प्रकार असतील तरी साध्या वडापावची चव आणि सर कशालाच नाही.

काही दिवसापूर्वी असेही वाचले होते, की एका वडापाव मधून ९ ग्रॅम प्रोटीन मिळतात. त्यात असेही सांगितले होते वारंवार एकाच तेलात तळल्या मुळे तो आरोग्याला नुकसान पोहोचवतो. घरी केला तर चांगला असतो. तेव्हा पासून आम्ही त्याला प्रोटीन खाद्य नाव ठेवले आहे. जगात कोणतेही कितीही विविध खाद्य प्रकार निर्माण झाले तरी वडापाव तो वडापावच! त्याची जागा कोणीच घेऊ शकत नाही.

***

# जैसे ज्याचे कर्म तैसे फळ देतो ईश्वर

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

एका कार्यालयात एक अधिकारी होता. त्याला कामाचा प्रचंड ताण होता. वरिष्ठांनी त्याची कान उघडणी केल्याने, सर्वासमोर आपला अपमान झाला असा त्याला वाटत होते. त्यात त्याची एक फाईल सापडत नव्हती. त्यामुळे तो नव्याने रुजू झालेल्या शिपायाला खूप जोरात बोलला. मी कालच नव्याने रुजू झालो आहे,माझे काय चुकले ? असे शिपाई म्हणताच, आधीच रागात असल्याने त्या नवख्या शिपायाच्या श्रीमुखात लगावली. तो शिपाई कावरा बावरा झाला पण काय करणार? साहेबाना काय बोलणार?

असाच फाईल शोधण्यात तो दिवस संपत आला. फाईल काही सापडली नाही. तो अधिकारी तसाच रात्री उशिरा घरी परतला. आणि तो शिपाई ही हिरमुसला होऊन आपल्या घरी परतला.


शिपायाला टेन्शन मुळे रात्रभर झोप आली नाही दुसऱ्या दिवशी रविवार होता. सकाळी तो उठल्यावर त्याच्या बायकोने चहा केला तर तो नासला. आधीच वैतागलेला शिपाई, तू घरात नीट लक्ष देत नाही म्हणून बायकोवर रागावला आणि त्याने तिला रागात एक चापट मारली.

बायको ही मग चिडलीआणि तेथून सरळ मुलांच्या रूम मध्ये गेली आणि आतून दार लावून घेतले. मुलगी अभ्यास करायला उठली होती. ती आईला म्हणाली आई, माझे काल गणिताचे गुण कळाले. मला ७० मार्क पडले. आई अगोदरच रागावलेली होती. ३० का कमी पडले? म्हणून आईने मुलीला एक थापड मारली.

चिडलेल्या मुलीने रागाने आपल्या लहान भावाला ,उठ अभ्यास कर म्हणून रागाने उठवले, तो नाही म्हणताच तिने त्याच्या पाठीत धपाटा लगावला. त्यामुळे तो मुलगा रडतच उठला. आणि रागारागाने घराच्या बाहेर गेला.

तो चिडलेला होता. त्याच्या समोर एक कुत्रे भुंकत होते . त्याने रागारागाने एक दगड उचलून कुत्र्याला मारला. ते कुत्रं चवताळले.तेथून एक मॉर्निंग वॉक करत असलेल्या एका माणसाला ते चावले. मुलगा घाबरून घरात पळून गेला. पायाला रक्त येत असल्याने घाबरलेल्या अवस्थेत तो माणूस घरी गेला. बायको म्हणाली आधी जखम धुवून मलम लावू ,मग दवाखान्यात जाऊ म्हणून बायकोने जखम धुवून मलमपट्टी करण्यासाठी जूनी आलमारी उघडली आणि वरून एक फाईल खाली पडली. तीच त्या अधिकाऱ्याची कार्यालयातील फाईल होती. आणि हा माणूस म्हणजे दुसरा कुणी नव्हता. त्या शिपायाच्या श्रीमुखात लगावणारा कार्यालयातील तोच अधिकारी होता. त्याला आठवले आपणच ही फाईल गडबडीत येथे ठेवली होती, आणि विनाकारण आपण

त्या नवीन शिपायाच्या श्रीमुखात लगावली. आपली चूक झाली, पण आता उपयोग काय? या माझ्या काल्पनिक कथेवरून एक लक्षात येते की माणसाने नेहमी शांत बुद्धीने विचार करून संयमाने वागले पाहिजे, राग राग करणे चांगले नसते आणि कर्म ही चांगले केले पाहिजे नाही तर वाईट कामाचे वाईट कर्माचे फळ ही वाईट मिळते, अर्थात जैसे ज्याचे कर्म तैसे फळ देतो ईश्वर.




# महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे एकत्रित महावाङ्मय प्रकाशित

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**मुंबई** – क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा वारसा त्यांच्या एकत्रित साहित्याच्या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत जाईल. या साहित्यामुळे नवीन पिढीला प्रेरणादायी दिशा मिळून यशस्वी होण्याचा मार्ग मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मंत्रालयात आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या समग्र वाङ्मयाचे प्रकाशन करण्यात आले. इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या महाज्योती संस्थेमार्फत ह्या महावाङ्मयाची निर्मिती करण्यात आली आहे. तसेच यावेळी इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या नव्या संकेतस्थळाचे उद्घाटनही मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री



एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, मंत्रिमंडळातील अन्य मंत्री तसेच विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यामध्ये महात्मा फुले यांचे २३ आणि सावित्रीबाई फुले यांचे १४ ग्रंथ, त्यांचा पत्रव्यवहार तसेच महत्त्वपूर्ण दस्तऐवजांचा समावेश आहे. पुण्यातील महात्मा फुले वाडा आणि साताऱ्यातील नायगाव येथील सावित्रीबाईंच्या शिल्पसृष्टीची रंगीत छायाचित्रे हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या मान्यतेने हा ग्रंथ प्रकाशित झाला असून, एकूण २७ हजार प्रती छापण्यात आल्या आहेत. प्रत्येक जिल्ह्यात ७५० प्रतींचे वितरण जिल्हास्तरीय शिक्षण विभाग, आर्थिक विकास मंडळ तसेच आश्रमशाळा व वसतिगृहांमार्फत करण्यात येणार आहे.

विभागाच्या संकेतस्थळाच्या माध्यमातून विभागाच्या सर्व योजना, शिष्यवृत्ती, वसतिगृहे तसेच विविध शासकीय उपक्रमांची माहिती नागरिकांना एका ठिकाणी सहज उपलब्ध होणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आलेले हे संकेतस्थळ वापरकर्त्यासाठी सोयीस्कर, सुलभ असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# लेकरांच्या स्वप्नांसाठी संघर्ष....

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**(मागील अंकावरून)**

गावाकडच्या उंबरठ्यावरून पुण्याच्या दारापर्यंतचा हा प्रवास मुळातच खडतर. पण असंख्य कुटुंबे हा प्रवास करीत आपल्या पाल्यांचे भविष्य घडवीत आहेत. दिनेश नकती यांचा प्रवास बघता असे म्हणावेसे वाटते.

डोंगरकपारीतून
शहर गाठले, घामात
भिजलेले स्वप्न
पाहिले।

रिक्षाच्या पॅडेलवर
झगडत, गाड्या धुऊन
भविष्य सजवले ।।

आईच्या हातांनी
कष्टे विणली, पानोपानी
जगाची भूक शमवली ।

पण सजवून ठेवले
शिक्षणाचे पान,
लेकरांनी फुलवले
शिक्षणरूपी ज्ञान ।।

थेंब थेंब घाम हा
झाला दीप, अंधारात उजळले मुलांचे रूप ।

मुळशीपासून पुण्यापर्यंतची वाट,
झगडणाऱ्या आई–बाबांची खरीच
बात ।।







अशा प्रकारचे जीवनाभुव आपणाला जेंव्हा येतात तेंव्हा आशेने मन भरून येत जीवनातील आनंदझरा मिळत राहतो.

२१ ऑगस्ट २०२५ ला चांदनी चौक ते कोथरूडपर्यंत जाण्यासाठी सोमनाथ गाडे नावाचे रिक्षा चालक भेटले. खारघर वरून पुण्याला आपल्या मुलासाठी ते गेल्या ५–६ महिन्यापासून स्थाईक झालेत. ते सांगत होते मुलाला फर्ग्यूसन कॉलेजमध्ये शिकण्याची संधी मिळालीय. खारघर सोडून साडेसहा हजार रूपये भाड्याची एक मोठी खोली घेऊन आम्ही रहात आहोत. सोमनाथ गाडे हे पण सकाळी गाड्या धुण्याचे काम करतात आणि दिवसभर रिक्षा चालवितात. त्यांच्याबद्दलही लिहिण्यासारखे आहे.












# आधी वंदू तूज मोरया...

## ॥ निसर्गरम्य - गणपती पुळे ॥

**ज्योतिर्मय साहित्य**

मुंबईपासून सुमारे ३५० कि.मी. अंतरावर कोकणातील रत्नागिरी जिह्यात गणपतीपुळे गणपतीचे मंदिर आहे.हे पेशवेकालीन अती प्राचीन मंदिर आहे. या लंबोदराच्या स्थानाचा इतिहास मुद्गल पुराणादी, प्राचीन वाङ्मयात पश्चिमद्वार देवता या नावाने आहे. कोकणातील प्रत्येक देवस्थान आणि देवतांविषयी वेगवेगळ्या दंतकथा आहेत.तशीच या स्थानाविषयी पण आहे. हिंदुस्थानच्या आठ दिशांत आठ द्वार देवता आहे. त्यापैकी गणपतीपुळ्यातील देवता ही पश्चिमद्वार देवता आहे. मोगलाईच्या काळात सुमारे इ.स. १६०० च्या पूर्वी, आज ज्या ठिकाणी स्वयंभू गणेश मंदिर आहे, त्या ठिकाणी डोंगराच्या पायथ्याशी केवड्याचे बन होते. त्या ठिकाणी बाळंभटजी भिडे हे ब्राह्मण रहात होते. ते गावचे खोत होते. मोगलाईच्या काळात भिडेंवर संकट कोसळले. भिडे हे दृढनिश्चयी होते. ''आलेले संकट निवारण झाले तरच अन्नग्रहण करीन'', असा निश्चय करुन त्यांनी आराध्य दैवत मंगलमूर्तीची उपासना करण्यासाठी या केवड्याच्या बनात तपस्या करण्यासाठी मुक्काम केला.

अन्नपाणी वर्ज करणाऱ्या भिडेंना एके दिवशी दृष्टांत झाला की, ''मी या ठिकाणी भक्तांच्या कामना परिपूर्ण करण्यासाठी आगरगुळे (गणेशगुळे) येथून दोन गंडस्थळे व दंतयुक्त स्वरुप धारण करुन प्रकट झालो आहे. माझे निराकार स्वरुप डोंगर हे आहे. माझी सेवा, अनुष्ठान, पूजाअर्चा कर, तुझे संकट दूर होईल.'' असा दृष्टांत झाला. त्याच कालखंडात खोत भिडे यांची गाय सतत काही दिवस दूध देत नव्हती. म्हणून गुराख्याने बारीक लक्ष ठेवले. तेव्हा त्याला दिसले की सध्याच्या मूर्तीच्या जागी डोंगरावरील एका शिळेवर गायीच्या स्तनातून सतत दूधाचा अभिषेक होत होता. हा प्रकार त्याने खोतांना सांगितला, त्यांनी तात्काळ सर्व परीसराची सफाई केली व त्यांना दृष्टांतातील गणेशाची मूर्ती आढळली. त्या ठिकाणी गवताचे छप्पर घालून त्यांनी छोटेसे मंदिर उभारले. आणि धार्मिक कृत्ये भिडे भटजींनी सुरु केली.

गणपतीपुळ्याला गणपतीपुळे हे नाव कसे पडले याचीही एक कथा आहे. पूर्वी या गावात फारशी वस्ती नव्हती. वस्ती झाली ती गावाच्या उत्तरेच्या बाजूला. गाव पश्चिम दिशेने उतरण असून बराचसा भाग पुळणवट आहे. हिंदुस्थानच्या पश्चिम भागाची मुख्य सीमा जो सिंधुसागर आहे, त्या लगतचे गाव



असून सकल देवतांमध्ये आराध्यदैवत अशी श्री मंगलमुर्ती तिने आपल्या निवासस्थानाला योग्य ठिकाण असे पाहून या समुद्रकिनारी निवास केला आहे. समुद्रापुढे पुळणीचे म्हणजेच वाळूचा किनारा, भव्य मैदानात गणपतीचे महास्थान असल्यामुळे या गावाला गणपतीपुळे म्हटले जावू लागले. गणपतीपुळे हे रत्नागिरी जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ आहे. येथील गणपतीची मूर्ती स्वयंभू आहे अशी मान्यता आहे. सह्याद्री पर्वतातील डोंगराळ भागात विराजलेली नैसर्गिक मूर्ती आणि जवळच पश्चिमेला अरबी समुद्र ह्यामुळे हे देऊळ आगळेवेगळे आहे. गणपतीची मूर्ती डोंगराच्या बाजूला असल्याने तिला प्रदक्षिणा घालण्यासाठी संपूर्ण डोंगराला प्रदक्षिणा घालणे क्रमप्राप्त असते. १ किलोमीटर लांबीचा हा प्रदक्षिणामार्ग समुद्र, वाळूचा किनारा आणि नारळ पोफळीच्या झाडांमुळे निसर्गरम्य असा परिसर आहे. या ठिकाणी समुद्र आणि वाळूचा किनारा असल्याने तेथे पर्यटकांची अतिशय गर्दी असते. पर्यटक सुट्ट्या मधे पुळ्याच्या समुद्राला अवश्य भेट देतात.महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ (..) मुंबई, पुणे, कोल्हापूर, नाशिक इत्यादी शहरांपासून गणपतीपुळे येथे जाण्यासाठी थेट बससेवा पुरवते.खाजगी स्वतः च्या वाहनाने येणाऱ्यांची संख्या खूप असते.

गणपतीपुळे येथे महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ (....)चे विश्रामगृह आहे. त्याशिवाय देवळातील गुरूजींकडे घरीसुद्धा राहण्याची सोय होऊ शकते.भक्तनिवास आहे. समुद्रकिनारा, निसर्ग, यामुळे गणपतीपुळे हे पर्यटनाचे ठिकाण झाले आहे. दरवर्षी लाखोच्या संख्येने पर्यटक भेट देतात.त्यांचे निवासाची सोयी साठी संस्थानाचे भक्तनिवास आहे.पाणी, चहा,कॉंफिची,व्यवस्था आहे. पार्किंग,लिफ्टची सोय आहे. याचवेळी आजूबाजूला असलेली, मालगुंडला- केशवसुत स्मारक,




ओंकारेश्वर मंदिर लोकमान्य टिळक जन्मस्थान-रत्नागिरी, स्वामी स्वरुपानंद मठ- पावस, वेळणेश्वर,उमा महेश्वर मंदिर-हेदवी,ई. ठिकाणे बघता येतात. निसर्रम्य अशा गणपतीपुळेला भेट देऊन गणपतीचे दर्शन आणि पर्यटन अशा दोन्ही गोष्टी साध्य होतात. आणि मन प्रसन्न होते.

## सल मनातली....

**ज्योतिर्मय साहित्य**

माझ्या रेसीपीचे नाव आहे आलेपाक मोदक आणि वडी, खजूर चॉकलेटस् मोदक हे काय ..? असा प्रश्न मनाला पडला ना ! खर सांगू तर याच्या मागचे कारण काही वेगळेच आहे. म्हणजे काय तेच तर सांगणार आहे. कुठेतरी उपक्रमात वाचनात आले की गणपती बाप्पाची तयारी, किंवा तुमच्याकडे तुम्ही कसा गणपती उत्सव साजरा करता वगैरे वगैरे..!




खर सांगायचे तर आत्ता या नोकरी, स्पर्धा रोजची जीवनाची धावा धाव रूटीन शिक्षण यामुळे अनेकदा हे सण उत्सव याचा तितकासा आनंद आता घेऊ शकत नाही. हे तितकेच खरे.

खरे तर आमच्याकडे गावी गणपती उत्सव अगदी आनंदात उत्साहात साजरा केला जातो. मुले लहान असताना पाहिले जाणे व्हायचे.पण नंतर हळूहळू मुलांच्या शाळा, परीक्षा, यामुळे अलीकडे अगदी एखाद्या वर्षीच जाणे होते. एखाद्या वर्षी म्हणण्यापेक्षा बऱ्याच वेळा जमतच नाही.

पण ठीक आहे, विचार केला तर मन उदास होते पण मग अनेकदा डोक्यात येते आणि मनाला एक वाटते जे करायचे ते अगदी मनोभावे त्यातील भाव भावना उद्देश महत्वाचा अर्थातच त्यात कमी जाणवते, पण मग विचार येतो कधीतरी वेगळ्या पद्धतीने साजरा करू.असे म्हणायचे आणि पुढे चालत राहायचे.

मग कॉलिनीतील गणपती बाप्पालाच जाऊन नमस्कार वगैरे आणि दहा दिवसातल्या एखाद्या दिवशी थोडा फार आपल्याला जमेल एवढा घरच्या घरीच प्रसाद बनवून एखाद्या दिवशी आरतीला जावून तो प्रसाद वाटायचा अशा प्रकारे दर वर्षी आमच्याकडे गणेशोस्तव साजरा होतो. तर त्याच प्रसाद वरून सल मनातली चे लेखन होत गेले.

असो, तर सहज सकाळी मॉर्निंग वॉकला गेले असताना बाप्पाच्या तिथूनच पुढे रस्ता आहे. डोक्यात सहज विचार आला, की अरे या वर्षी बाप्पाला काय प्रसाद बनावावयाचा ? आणि एवढ्यात बाजूने चाललेल्या ताई बोलल्या,

''चला ओ वहिनी पटपट'' आणि विचाराची शृंखला तुटली. झपा झप पावले टाकत चालू लागले. कॉलीनीतील रस्ता मागे टाकत शेताच्या रस्त्याला लागले.चालत असताना उजव्या बाजूला असलेल्या झोपडपट्टीतल्या असेच काही नाही,पण बहुतेक बांध कामावर असणाऱ्या लोकांची वस्ती असावीबहुदा, चेहऱ्यावरील कुरळ्या भुऱ्या केसांच्या बट बाजूला सरकवत ५ते६ वयोगटातील अगदी अशक्त अशा दोन तीन लहान मुलांना ओल्या गवतातून रस्त्याला येताना पाहिले, त्यातल्या एक दोघांना सर्दी खोकला असलेली जाणवत होती, आणि डोक्यात एक विचार अनेक प्रश्नांना उपस्थित करून गेला. आपल्या परीने आपण समजा या मुलांसाठी आले पाक दिला तर..! वेगळा गणेशोस्तव..! पण देणार कसे? बाप्पाचा प्रसाद म्हणून..? घरी आले, कामे आवरून दुपारी,

आलेपाक मोदक - साहित्य आल्याचा किस अर्धी वाटी, पाव वाटी पाणी, एक वाटी साखर, हळद चिमूटभर, विलायची चवीपुरती, आणि छोटा चमचा तूप,

आल्याचा कीस तुपात भाजून त्याच्यात साखर पाणी घालून सर्व पदार्थ घालून मिश्रण एक तारी तयार झाले की ताटात ओतून लगेचच कापणे.

खजूर चॉकलेट - साहित्य खजूर बिया दहा पंधरा, पिठी साखर छोटी वाटी किंवा आपल्या अंदाजे,आणि विलायची पूड, कोको पावडर

खजुरतील बिया काढून सर्व पदार्थ बारीक वाटून घेऊन तुपाचा हात घेऊन छोटे छोटे मोदक तयार करायचे. आणि केले ही... पण... द्यायचे कसे?

आजकाल लोकांमधली विश्वासार्हता कमी झाली आहे. आणि असे ही नको, की त्यांच्यावर दया म्हणून किंवा त्यांचे पालक त्यांची काळजी घ्यायला सक्षम असतीलच किंवा घेऊच शकतात, असा विचार डोक्यात आला. पण तरीही काहीतरी वेगळे आणि मनाला समाधान म्हणून . या वर्षीचा प्रसाद काहीतरी वेगळा !

माझी कल्पना घरामध्ये सांगितली, पण घरातले म्हटले कल्पना छान आहे,पण असे नको व्हायला की त्यांच्यावर दया दाखविल्या सारखे किंवा आणखी काही वेगळंच.आणि डोक्यात असा ही विचार आला की स्वतःला आपण काय खूप महान समजतोय का? शेवटी त्यांनाही स्वाभिमान आहेच की ! म्हटल जावू दे नकोच.

बरं ठीक आहे की, जाऊ दे तसेही आता पावसाळ्याचे दिवस सुरु आहेत.आपल्या कॉलीनितील बाप्पालाच प्रसाद म्हणून वाटला तर?

पण नंतर एक प्रश्न की तिखट प्रसाद चालेल का? पण असुदे देत काहीतरी आरोग्यदायी आणि इतरांपेक्षा वेगळे वाटलेल केव्हाही चांगलेच. आणि प्रसाद हा प्रसादच असतो.तो असा आणि तसा हे तर आपणच..! नाहीतरी काय तेचं तेच पेढे,लाडू सगळे वाटतातच की आपले वेगळे काहीतरी देऊ.




पण म्हणजे कधी कधी असे होते ना ! मनात असूनही काही करू शकत नाही. राहून राहून मनात विचार घोळत होता.पण एका क्षणाला डोक्यात विचार आला आपणच समज गैरसमज यामध्ये का अडकायचे.

बनवलेला प्रसाद घेतला.आरती झाल्यानंतर मनोभावे बाप्पाला दाखवला. तिथून थोड्या अंतरावरच ती वस्ती होती. बोलून प्रश्न सुटतात असे म्हणतात . त्यांना आपण विचारू शकतोच की,घेतले तर ठीक नाहीतर तरीही ठीक.

हिम्मत केली ,आणि गेले त्या मुलांच्या पालकांना विचारले.त्यांनीही मोठ्या आनंदाने बाप्पाच्या प्रसादाचा स्वीकार केला. त्यांच्या चेहऱ्यावरचा तो आनंद आणि आपल्याला मिळालेल्या आत्मिक समाधान खूप छान वाटत होते. ते म्हणतात ना बोलून प्रश्न सुटतात याचा अगदी मनोमन प्रत्यय आला.आणि ते खरेच आहे.

मनातली सल सल ना राहता तिचे आत्मिक समाधानात रूपांतर झाले आणि तिथून निघाले.

माघारी येताना गणपतीला बाप्पाला नमस्कार केला, एक वेगळी चमक एक वेगळे तेजच जणू चेहऱ्यावर ओसंडून वाहत असल्याची जाणीव झाली.

बोलून गोष्टी सोप्या होतात मनातली सल जर बोलले नसते, तर मनातच राहिली असती. आणि खरचं खूप छान वाटले. खऱ्या अर्थाने उत्सव साजरा झाला असे वाटले.

।।गणपती बाप्पा मोरया या।।
।।मंगल मूर्ती मोरया या।।

## एक संवाद : बाप्पाशी ...


**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

अठराशेब्याण्णव मध्ये तुझा पहिला सार्वजनिक उत्सव झाला. तेव्हापासून तू नित्यनियमाने दरवर्षी सार्वजनिक उत्सवांमध्ये हजेरी लावतोस. तुझा उत्सव आधी कोणी सुरु केला ? लोकमान्य टिळकांनी की भाऊसाहेब रंगारी यांनी हे मला फार महत्वाचे वाटत नाही. कारण त्यापेक्षाही तू महत्वाचा आहेस. पण तुझा सार्वजनिक उत्सव सुरु झाला आणि स्वातंत्र्य चळवळीला एक वेगळाच रंग भरला. एक वेगळेच चैतन्य आले. तुझ्या भेटीच्या निमित्ताने लोक एकत्र येऊ लागले आणि जनजागृती होऊ लागली. स्वातंत्र्य जवळ आले. तसा तू आधी घराघरात येतच असायचास. अगदी ऋग्वेदापासून अनेक ग्रंथात आणि पुराणांत तुझे उल्लेख आढळतात. तुझ्या जन्माविषयी तर निरनिराळ्या कथा प्रचलित आहेत. आणि केवळ भारतातच नव्हे तर परदेशातही तुझी मंदिरे आहेत. तुझे आराधना करणारे भक्त आहेत.



स्वातंत्र्यपूर्व काळात जशी जनजागृती तुझ्या सार्वजनिक उत्सवातून झाली, तशी आणि तेवढ्या प्रमाणात आज होताना दिसत नाही. पण तरी आज विविध चलचित्र देखावे उभे केले जातात. त्यातून काहीतरी सामाजिक प्रश्न मांडण्याचा प्रयत्न होतो. आणि त्यातून कळत नकळत जनजागृती होते. कधी कधी ऐतिहासिक वास्तूचा देखावा उभा केला जातो. कधी कधी एखाद्या पौराणिक कथेवर आधारित देखावा असतो. कलाकार खूप मेहनत घेऊन हे देखावे तयार करतात. आणि तुझे भक्त आपल्या कामातून वेळ काढून हे देखावे पाहण्यासाठी गर्दी करतात. ते दिवसभराचे थकलेले असतात. पण तुझ्या दर्शनाने त्यांचा शीण कुठल्या कुठे पळून जातो. पण काळानुसार या चांगल्या गोष्टींसोबत काही वाईट गोष्टीही तुझ्या उत्सवात शिरल्या आहेत. तुझ्या उत्सवाचा राजकीय फायदा उठवणारे नेते आहेत. बळजबरीने वर्गणी वसूल करणारे आहेत. तुझ्या उत्सवासाठी विजेची चोरी करणारे आहेत. भले मोठे स्पीकर किंवा कानठळ्या बसवणारे डीजे लाऊन सर्वसामान्यांना दहा बारा दिवस वेठीला धरणारी मंडळी आहेत. कदाचित नको ती गाणी कर्कश आवाजात तुझ्यापुढे वाजवली जातात. दांडिया खेळला जातो. जलप्रदूषण, ध्वनिप्रदूषण इ. ना आमच्या अशा वागण्यामुळे हातभार लागतो. हे खचितच तुला आवडत नसावे. पण बाप्पा, तूच बुद्धी दे. आणि हे मळभ दूर कर रे बाबा. खरे तर तुझ्याकडे काही मागावे अशी आमची पात्रता नाही. कारण तू न मागता देणारा आहेस. विघ्नहर्ता आहेस.




खरं तर तुझ्याकडून काही गोष्टी आम्ही शिकल्या पाहिजेत. तुझे सुपासारखे मोठे कान आम्हांला सांगतात की भरपूर ऐका. श्रवणाद्वारे ज्ञान ग्रहण करा. उत्तम श्रोते व्हा. लहान मोठ्या गोष्टी कानात साठवा. तुझे बारीक असलेले डोळे सांगतात की कुठल्याही गोष्टीचे नीट बारकाईने निरीक्षण करा. त्याशिवाय निष्कर्षाला पोहचू नका. तुझे विशाल उदार सांगते की जीवनातील सुखदुःख आपल्या उदरात सामावून घ्या. मोठी सोंड म्हणजे एखाद्या व्यक्तीची वा गोष्टीची चांगले किंवा वाईट दुरूनच ओळखण्याची क्षमता दर्शवते. तसेच संकटाना घाबरू नका धैर्याने सामोरे जा हे ही ती सांगते.

समर्थ रामदासांनी तुझी आरती लिहिली ती किती सुंदर आहे ! त्यांनी अगदी योग्य विशेषणे वापरलीत तुझ्यासाठी. सुखकर्ता, दुःखहर्ता. खरंच तू सुखकर्ता आहेस. तुझ्या दर्शनाने दुःख नाहीसे होते. तू विघ्नहर्ता आहेस. म्हणून तर प्रत्येक शुभ कार्याच्या सुरुवातीला तुझे पूजन होते. अग्रपूजेचा मान तुलाच दिला जातो. सर्व वेद, शास्त्र, पुराणे तुझीच महती गातात.

त्यांची सुरुवात तुझ्या वंदनानेच होते. तू आदिदेव आहेस. बुद्धी देणारा आहेस. अथर्वशीर्षात तर तुझे किती छान वर्णन केले आहे. ' त्वं ज्ञानमयो विज्ञानमयोसी. ' असा तू आहेस. ज्ञानेश्वर माउलींनी तर ज्ञानेश्वरीची सुरुवात तुझ्या वंदनानेच केली आहे. शब्दरूप, तत्वरूप, नादरूप आणि ओंकार स्वरूप तू आहेस. लता मंगेशकरांनी आपल्या सुंदर आणि गोड आवाजात तो अभंग अजरामर केला आहे. तुलाही तो ऐकायला आवडत असणारच. मी ही आता तोच म्हणतो आणि थांबतो. गोड मानून घे. आणि तुझ्या मायेची पाखर सदैव आमच्यावर राहू दे.

ॐ नमोजी आद्या । वेद प्रतिपाद्या ।।
जय जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ।।१।।
देवा तूंचि गणेशु । सकळमति प्रकाशु ।।
म्हणे निवृत्ति दासु । अवधारिजो जी ।।२।। अकार चरण युगुल । उकार उदर विशाल ।। मकार महामंडल । मस्तकाकारें ।।३।।
हे तिन्ही एकवटले । तेथें शब्द्ब्रम्ह कवळलें ।। ते मियां श्रीगुरुकृपें नमिलें । आदिबीज ।।४।।

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559